सातारा, बुधवार, २५ जानेवारी २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कोरेगावला १३ फेब्रुवारीपासून राष्ट्रीय परिषद

**सातारा** : कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये 'शोषितांचे साहित्य : जागतिक परिक्षेत्र' या विषयावर १३ व १४ फेब्रुवारीस दोन दिवसांची राष्ट्रीय परिषद होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी दिली. परिषदेचे उद्घाटन समीक्षक प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. सुशील ओडियार (रशिया), डॉ. आमीर हुसेन (बांगलादेश), डॉ. संतोष पाधी (ओडिशा), डॉ. भालचंद्र शिंदे (गुलबर्गा), डॉ. यशपाल भिंगे (नांदेड), डॉ. महेश खरात (औरंगाबाद), डॉ. गजानन चव्हाण (पुणे), प्रदीप देशपांडे (मुंबई) हे सर्वजण या परिषदेत विचार मांडणार आहेत. परिषदेत जागतिक दर्जाच्या ग्रंथांचे प्रकाशन केले जाणार असून, अभ्यासकांनी आपले संशोधन पेपर पाठवावेत.